हर जोर जुल्म के टक्कर मे संघर्ष हमारा नारा है ।

शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समिती आयोजित

## २० एप्रिल : शेतमजूरांच्या मुंबई मोर्चात सामील व्हा ।

मंगळवार : दि. २० एप्रिल ९३ दुपारी १ वा.

स्थळ : आझाद मैदान (व्ही.टी.समोर ) मुंबई.

ग्रामिण कष्टकरी भावा - बहीणींनो ।

आपण रात्रं दिवस राब राब राबून देखील पोटाला दोन वेळेसची भाकरी मिळत नाही. कारण आपण केलेल्या कामाचा पुरेपुर मोबदला दिला जात नाही. आपल्या कष्टाची दिवसा ढवळ्या सर्रास चोरी होते. पण आपल्या अडाणी व असंघटित्तपणा मुळे आपण हतबल होतो. वाट्टेल ते कष्ट करण्याची तयारी असून देखील आपल्याला पाहीजे तेंव्हा काम मिळत नाही त्यामुळे वारंवार उपासमारीला तोंड द्यावे लागते. या उपासमारीतून सुटका व्हावी म्हणून आपण गावालगतची पडीक सरकारी वा जंगल जमीन वहीतीखाली आणून पोट भरु लागलो तर आपल्याला गावगुंड व पोलिसा मार्फत त्रास दिला जातो.

या सर्व प्रश्नाचा मुकाबला करुन ते सोडवता यावेत म्हणून आपण ग्रामिण कष्टक-यात काम करणा-या घटक संघटनाची शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समिती गठीत केली आहे. या समितीच्या वतीने गेल्या ६-८ महिन्यापासून राज्यभर जागरण सुरु केले आहे. नुकतीच आपण औरंगाबादेत शेतमजूर भूमिहीन परिषद घेऊन शेतमजूरांच्या व भूमिहीनांच्या मागण्या वेशीवर टांगण्याचा प्रयत्न केला आणि या मागण्याचा पाठपुरावा करण्यासाठी मुंबई विधान सभेच्या अर्थसंकल्पी अधिवेशनावर २० एप्रिल रोजी शेतमजूरांचा प्रचंड मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे.

### -: आपल्या मागण्या :-

(१) शेतमजूर व रोजगार हमी कामगारांचे किमान वेतन तात्काळ ४० रुपये करा.

(२) शेतमजूरांसाठी सर्वंकष कायदा करा.

(३) रोजगार हमीची कामे प्रत्येक गावात ५ कि.मी. चे आत काढून दररोज माणशी एक किलो धान्य कामाचा मोबदला म्हणून पूर्वीप्रमाणे द्या, आणि मजूरीचे वाटप आठवडयाला नियमीत करा.

मागे पहा..२

(४) भूमिहीनांना वाटल्या जात असलेल्या गायरान जमनीमधील गैर प्रकारांना तात्काळ पायबंद घालून, जंगल जमीनीचे वाटप करा.

(५) टंचाईग्रस्त गावांना शुध्द पाणी पुरवठा करा.

(६) जातीयवादी व धर्मांध शक्तींचा बीमोड करा.

(७) दारूबंदी राज्यभर करण्यासाठी उपाय योजना करा.

या व इतर शेतमजूर व ग्रामिण कष्टक-यांच्या जीवनमरणाच्या मागण्यासाठी २० एप्रिल ९३ रोजी निघणा-या मोर्चात हजारोंच्या संख्येने सहभागी व्हा.

000